# नागरिक अधिकार

संपादक : सुभाष बसवेकर

वर्ष २ ले. अंक ३ रा. नवी मुंबई दिनांक १ ते ३० सप्टेंबर २०१२ पाने १६ किंमत २० रूपये




राज्य माहिती आयोगाच्या २०११ अहवालातील नग्नसत्य !

## अजब न्याय आयुक्तांचा.......

## जनतेच्या पदरात साडेतीन टक्के न्याय !

## सरकारी बाबुंना साडे शहान्नव टक्के अभय ?



## शेतकरी व जनावरांना दुष्काळाचा उपास

## कोठे गेला निधी? करा RTI तपास



## पेट्रोलपंपावरील सुविधा

## आणि ग्राहकांचे अधिकार

माहिती अधिकार कायद्याचा प्रसार करणारे झुंजार मासिक !

मासिक
# नागरिक अधिकार

सुभाष बसवेकर
● संपादक ●
गणेश काजळे-पाटील
●कार्यकारी संपादक●

संपादक मंडळ /प्रतिनिधी
किरण मांजरेकर (मुंबई)
कु.शीतल कापूरे (नवी मुंबई)
राजेश बने (रायगड)
भगवान वाह्वूळे (पूणे)
राजेश ठाकूर (नागपूर)
प्रीतम यादव (सातारा)
अजित कोठारी (जालना)
देविदास चौथमल (औरंगाबाद)

अंक दर महिन्याच्या दहा तारखेला प्रकाशित होतो. अंकात प्रकाशीत झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाहीसर्व वादविवाद पनवेल नवी मुंबई न्यायालय कक्षेत.

पत्ता : नागरिक अधिकार
प्लॉट नं. ई-९६ सेक्टर-१२
खारघर, नवी मुंबई ४१०२१०
मो.९२२३५१६९२०
E- mail :
mediamansubhash@gmail.com
: web site :
rtimahasangh.weebly.com
: Blog :
subhashbaswekar blog

## संपादकीय...........

## "अंधार फार झाला ,पणती जपून ठेवा"

देशात अनेक प्रश्नांचा गुंता झाला आहे.भ्रष्टाचार,महागाई, शेतक-याच्या आत्महत्या,वाढता हिंसाचार,जातीय व धार्मिक विद्वेष,नक्षलवाद, अशा अनेक प्रश्नांचे शेपूट काही केल्या कमी होत नाही. देशात आशेने पाहावे असे काही घडताना दिसत नाही.वर उल्लेखीलेले सर्व प्रश्न एकाच्या आत एक कडी असून ते सोडविण्याची एक सूत्र बुद्ध चावी अजूनही आम्हाला सापडलेली नाही.स्पप्न भंग झालेल्या माणूस खचून जावून वेडयासारखा भटकत राहतो तसा आज आदर्शवाद आमच्या देशात कोठेतरी भरकटत जावून अडकून पडलेला आहे.तो कोठे शोधायचा हा मोठा प्रश्न आहे. कारण जेथे जावे तेथे अनिती व आनास्था यांना धिंगाना घातला आहे.स्कारण राजकीय नेते हा देश सुधारवतील ? या प्रश्नाचे उत्तर स्पष्टपणे नाही असेच आहे.ज्या हातात देशाच्या सत्तेची सूत्रे आहेत. त्या लोकांच्या संसदेतील माकड चेष्ठा पाहिल्या तर हे सरळ व सामान्य अशा करोडो भारतीयांचे प्रतिनिधी आहेत हेच मनायला मन तयार होत नाही.देशासमोर हजारो प्रश्न आहेत.सगळीकडे समस्यांचा महापूर आहे व समस्येची उकल करण्यासाठी करायच्या उपाययोजनांचा मोठा दुष्काळ आहे. देशहित की सत्ता टिकविणे असे दोन पर्याय समोर असल्यामुळे राज्यकर्ते फक्त खूर्च्या उबविणे महत्वाचे मानत असून देश गेल्ला खडयात अशी मानसिकता झालेली आहे.देशात कोठेही जा अनेक प्रश्न आहेत.या प्रश्नाकडे आता कोणीच गंभीरपणे पाहत नाही.काही कोटी लाख रूपयाचा भ्रष्टाचार माध्यमातून चर्चिला जातोय या मोठया घोटाळयाची चौकशी करणे किंवा वस्तूस्थिती सामान्य जनतेसमोर आणणे याला सत्ताधारी मंडळीचा तयारी नाही.एकमेकाकडे बोट दाखवून सारेच राजकीय पक्ष परस्परांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करीत आहे.अशा वेळी देशाला कोण वाचविणार हा मोठा प्रश्न आहे.सगळीकडेच अंधारून आले आहे.या अंधारातून मार्ग कसा काढायचा याचा काही एक विशेष फार्मूला आमच्याकडे नाही.या सगळया प्रश्नांच्या व समस्यांच्या चक्कीत पिसला जाणार सामान्य माणूस कसा विचार करतो ते महत्वाचे आहे.आणि खरे तर तोच आता यादेशाचा शेवटचा व पहिला आधार आहे.हा सामान्य माणूस राजकीय व सामाजिक परिप्रेक्ष्यावर अधिक जबाबदार व शहाणा होवून नक्कीच या सगळया गुंत्यातून मार्ग काढील अशी आशा आहे.

ज्यांच्या मनात हरण्याची भीती असते त्यांचा पराभव निश्चीत असतो.



# अजब न्याय आयुक्तांचा.......
# जनतेच्या पदरात साडेतीन टक्के न्याय !
# सरकारी बाबुंना साडे शहान्नव टक्के अभय ?

राज्य माहिती आयोगाच्या सर्व आयुक्तांनी जनमाहिती अधिकाऱ्यांना आर्थिक दंड व शास्ती केलेल्या कामगिरीचा आलेख (दि.०१.०१.२०११ ते दि.३१.१२.२०११)

| निकाली काढलेली अपिले | आर्थिक दंड आकरलेल्या अपिलाची संख्या | आर्थिक शास्तीची टक्केवारी |
|---|---|---|
| १६,२११ | ४५९ | ३.६ टक्के |

माहिती अधिकार कायद्यातील तरतूदीप्रमाणे राज्याच्या मुख्य माहिती आयुक्तलयाकडून दरवर्षी वार्षिक अहवाल विधीमंडळाला सादर केला जातो. सन २०११ चा अहवाल जो सादर केला तो आता आयोगाने संकेतस्थळावर उपलब्ध केला आहे.२०११ च्या अहवालात माहिती आयुक्तांनी माहितीचा अधिकार कायदा प्रभावीपणे कसा राबविला गेला. अनेक विभागीय आयुक्तस्तरावरील आयुक्तांची पदे रिक्त असतानाही माहिती आयुक्त किती वेगाने व सातत्याने काम करीत आहेत.याचे गुणगाण या अहवालात करण्यात आले आहे.२००६ पासून महाराष्ट्रात माहिती अधिकार केल्या जाणाऱ्या अर्जदारांची संख्या वाढत चाललेली दिसून येत आहे.२०११ मध्ये अर्जांची संख्या तब्बल सहा लाख पंचेचाळीस हजार तेवीस इतकी होती. त्यापैकी ६ हजार सात हजार सत्तावन अर्ज निकाली काढण्यात आले ही माहिती अधिकार कायद्यातील जमेची बाजू आहे. परंतु माहिती मिळाली नाही म्हणून राज्यातील सर्व माहिती आयुक्ता कडे २०११ मध्ये २२३३९ द्वितिय अपिले दाखल झाली व २०११ पूर्वीची १२८६६ अपिले प्रलंबीत होती म्हणजे सर्व माहिती आयुक्तांकडे सुनावणीसाठी एकूण ३५२०५ अपिले होती त्यापैकी २०११ या वर्षात १६२११ अपिले निकाली काढण्यात आली. एवढे करूनही आयोगाकडे २०११ अखेर एकूण १८९९४ अपिले सुनावणीविना प्रलंबीत राहिली होती.जन माहिती अधिकाऱ्यावर माहिती अधिकार कायद्याचा दंडशक्तीचा धाक राहिलेला नाही त्यामुळे जनमाहिती अधिकारी माहिती देत नाहीत.प्रथम अपिलीय अधिकारी गंभीरपणे प्रकरणे हातळीत नाहीत.म्हणूनच द्वितिय अपिले भराभर वाढतात हेच या आकडेवारीवरून दिसून येते.

२०११ या वर्षात राज्यातील मुख्य व सर्व विभागीय माहिती आयुक्तांनी मिळून १६२११

सुरूवात कशी झाली यावरच बऱ्याच गोष्टीचा शेवट अवलंबून असतो.

## कामगिरी व निष्कर्ष यात विसंगती

२०११ या वर्षात राज्य माहिती आयोगाने एकत्रीतपणे १६२११ अपिले निकाली काढली या पैकी आयोगाच्या मतानुसार कलम २०(१)अन्वये ४५९ जनमाहिती अधिकारी व कलम २०(२)अन्वये ४१६ जनमाहिती अधिकारी असे एकूण केवळ ८७५ जनमाहिती अधिकारी कसूरदार ठरले.म्हणजेच १६२११ पैकी १५३३६ अपिलार्थ्यांनी दोषारोप ठेवलेले जनमाहिती अधिकारी निर्दोष आहेत. असे आयोगाचा अहवालच स्पष्टपणे सांगत आहे.जर १६२११ पैकी जर १५३३६ अपिलामध्ये जनमाहिती अधिकाऱ्यांचा माहिती देण्यात कसलाही दोष नव्हता हे न्यायसत्य असेल तर या १६२११ पैकी १५३३६ अपिलार्थ्यांनी जी अपिले केली ती तथ्यहिन होती याच्याशिवाय वेगळा निकर्ष यातून निघूच शकत नाही.किंवा फार तर सदर अपिले ही विनाकारण व निरूद्देष हेतूनी किंवा खोडसाळपणे किंवा टाईमपास म्हणून केली होती असा ध्वनित अर्थ निघतो.वर्षभरात निकाली काढलेल्या १६२११ पैकी १५३३६ अपिले जर आयोगाच्या मते तथ्यहिन ठरत असतील तर माहिती अधिकार कायद्यामुळे नागरिकांमधील निराशेची व हातशेची भावना कमी होत असून शासकीय अधिकाऱ्यांना त्यांच्या कामाचा जाब विचारण्यांची सुखावह जाणीव नागरिकांत निर्माण होत आहे.असा अहवालाच्या प्रस्तावनेत मुख्य माहिती आयुक्तांनी काढलेला निष्कर्ष हा आयोगाच्या कामगिरीशी एकदम विसंगत असा ठरतो.

| दिनांक ०१.०१.२०११ ते ३१.०१.२०११ या कालावधीत शास्ती व विभागीय चौकशी बाबतचा एकत्रीत गोषवारा | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | विभागाचे नाव | शास्ती केलेल्या प्रकरणाची संख्या कलम २०(१) | शास्तीची रक्कम रूपये | एकूण विभागीय चौकशीची शिफारस केलेल्या प्रकरणाची संख्या कलम २०(२) |
| १ | मुंबई (मुख्यालय) | १४ | १,८७,७५० | २८ |
| २ | बृहन्मुंबई | ३ | २५,००० | ३९ |
| ३. | कोकण | १०४ | २,२९,४०० | ० |
| ४. | पुणे | ५१ | ७,१६,३५० | १ |
| ५. | औरंगाबाद | ८२ | १५,५५,००० | ४४ |
| ६. | नागपूर | ८९ | ६,०३,००० | ३३ |
| ७. | अमरावती | ४४ | १,६२,००० | २६३ |
| ८. | नाशिक | ७२ | ९,६४,२५० | ८ |
| | एकूण | ४५९ | ४४,४२,७५० | ४१६ |

अपिले निकाली काढली त्यापैकी केवळ ४५९ प्रकरणात माहिती आयुक्तांनी माहिती अधिकार कायदा कलम २०(१) नुसार अर्थिक दंड केला आहे.म्हणजे दंडाचे प्रमाण केवळ ३.६टक्के एवढे येते.म्हणजे प्रत्येक १०० द्वितिय अपिलामागे माहिती आयुक्तांनी केवळ साडेतीन ते चार अपिले शास्तीयोग्य ठरविली.बाकीच्या ९६ टक्के आपिलामध्ये जनमाहिती अधिकाऱ्यांना शास्ती करणे योग्य मानले नाही.यात माहिती न देणारे जनमाहिती अधिकारी माहिती आयुक्तांना आर्थिक दंड करण्याइतपत कसूरदार का वाटले नाहीत ? ९६ टक्के जनमाहिती अधिकारी बेकसूर ठरतात हे प्रमाण खूपच एकतर्फी वाटत नाही काय?हा प्रश्न या कायद्याविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना पडणे स्वाभाविक आहे.

माहिती आयुक्ताकडे अपिलार्थीनी केलेल्या प्रत्येक प्रकरणातील जनमाहिती अधिकारी यांना दोषी ठरवून सरसकट दंड लावावा अशी कोणीच अपेक्षा करणार नाही.सगळयाच प्रकरणात जनमाहिती अधिकारी खरेच कसुरदार असेल असेही नाही.परंतु दंड न होता न्यायप्रक्रियेतून सहज सुटणारे जनमाहिती अधिकारी जर सरासरीने प्रमाण ९६ टक्के इतके असतील व न्यायासाठी याचना करणाऱ्या अपिलार्थीना केवळ सरसरी

रात्री मनाची कवाडे बंद करण्यासाठी व सकाळी उघण्यासाठी ची गुरूकिल्ली म्हणजे प्रार्थना.

चार टक्के इतक्या एकतर्फी तफावतीने न्याय मिळत असेल अशा वेळी न्याय प्रक्रियेची विस्वासहर्ता पणाला लागते .जनमाणसाच्या अशा न्याय प्रक्रियेवरील विस्वास उडाला तर समाजाला त्याची मोठी व न भरून येणारी किंमत चूकवावी लागते.माहिती नाकारणारे कसूरदार आरोपी व माहितीची याचना करणारे अपिलार्थी यांच्या पदारात जे काही पडते त्यात ९६ टक्के व ४ टक्के इतकी तफावत निश्चितच काही प्रश्न उपस्थित करते.

जन माहिती अधिकारी माहिती अधिकार कायद्यानुसार माहिती मागणारा नागरिक जनमाहिती अधिकाऱ्याकडे अर्ज करतो.तेथे माहिती मिळाली नाही अथवा मिळालेल्या माहितीने समाधान झाले नाही तर प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिल करतो.तेथेही माहिती मिळाली नाही किंवा समाधानकारक माहिती मिळाली नाही तरच विभागीय माहिती आयुक्तांकडे दुसरे अपिल करतो.म्हणजेच दुसरे अपिल करण्यासाठी माहिती मागण्याच्या एका विशिष्ठ प्रक्रियेतून जावे लागते.माहिती मिळविण्यास इच्छूक असलेला नागरिक उठला आणि त्याने सरळ व थेट माहिती आयुक्तांकडे अपिल केले असे होत नाही.माहिती अधिकार कायद्याचे प्रारूपच असे बनविले आहे की शक्यतो माहिती न मिळाल्यामुळे व्यथींत झालेली व्यक्तीच दुसऱ्या अपिलापर्यंत पोहचावी.तरीही मोठया संख्येने द्वितीय अपिलांचा डोंगर वाढत आहे.व त्याच मोठया संख्येने जन माहिती अधिकारी निर्दोष सुटत आहेत.हे अनाकलनीय आहे. माहिती आयुक्त हे माहिती अधिकार कायद्याचा कणा आहेत.एकूण

द्वितिय अपिल निकाली काढलेल्या १00 पैकी ९६ प्रकरणात माहिती न दिल्याचा कसूरदार असल्याचा आरोप असणारा जनमाहिती अधिकारी जर दंड न होता न्याय प्रक्रियेतून सहज बाहेर येणार असेल तर न्यायाची याचिका करणारे ९६ टक्के नागरिक विनाकारण याचना करतात असा अर्थ यातून ध्वनित होतो.कोणत्याही न्याय प्रक्रियेत न्याय मागणारा याचक इतक्या मोठया सरासरीने विनाकारण दाद मागेल हे अविस्वसनिय आहे.

माहिती अधिकार कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीत माहिती आयुक्तांची भूमिका फार महत्त्वाची ठरते.त्यातही कलम २०(१) प्रमाणे जर जनमाहिती अधिकारी एक दिवसाच्या विलंबासाठीही माहिती देण्यात दोषी ठरला तरी त्यास किमान २५० रूपये जास्तीत जास्त विलंबाबददल २५,००० इतका दंड झालाच पाहिजे.अशी माहिती अधिकार कायद्यात स्पष्ट उल्लेखलेली भूमिका माहिती आयुक्तांनी घेतली तरच या कायद्याचा धाक निर्माण होवून प्रशासकीय पातळीवर पारदर्शकता निर्माण होईल व भ्रष्टाचार कमी होईल.म्हणजेच या कायद्याच्या सुरूवातीला उद्देशपत्रिकेत वर्णीलेले अपेक्षा पूर्ण होईल .अन्यथा माहिती नाही दिली तरी दंड होणार नाही व आपण कसूरदार ठरणार नाही अशी ९६ टक्के शक्यतापूर्ण खात्री जर जनमाहिती अधिकाऱ्याची होणार असेल तर या कायद्याला ईश्वरही वाचवू शकणार नाही.

जीवन जेव्हा आपल्या हातातून निसटून जाण्याची वेळ येते तेव्हा आपल्याला त्याचे महत्त्व कळते.

## आरटीआय कार्यकर्ते,सामाजिक कार्यकर्ते व जागरूक नागरिकांना एक आवाहन

# नागरिक अधिकार

हा अंक आपणास आवडला का ? प्रत्येक महिन्याला नवनवीन फ्रेश आणि उत्तमोत्तम माहिती आपल्याला घरपोच यावी असे मनापासून वाटते ना ?तर मग आपण विस्वासाने बिनधास्तपणे नागरिक अधिकार परिवाराचे सदस्य बना.

## आपण या अंकाचे वर्गणीदार व्हा !

**वार्षिक : २४०रूपये. पंचवार्षिक : १००० रूपये आजीवन :५,०००रूपये**

आपले डी.डी./ चेक **नागरिक अधिकार** या नावाने काढून संपादक नागरिक अधिकार प्लॉट नं.ई.९६,सेक्टर -१२ खारघर, नवी मुंबई ४१०२१० या पत्यावर रजिस्टर पोस्टाने पाठवावेत किंवा तुमच्या शहरातील जवळच्या स्टेट बँक ऑफ इंडिया च्या कोणत्याही शाखेतून **20102640492** या नंबरच्या खात्यावर सुभाष बसवेकर (संपादक नागरिक अधिकार पनवेल शाखा) या नावाने पैसे भरू शकता.बँकेत पैसे भरताच आपले नाव व पत्ता ९२२३५१६९२० या नंबरवर फोन करून कळवावा.आपणास आपल्या पत्यावर नियमित अंक पाठवला जाईल.

---

## आरटीआय कार्यकर्ते,सामाजिक कार्यकर्ते व जागरूक नागरिकांना सभासद होण्यासाठी आवाहन

जनजागृती ! संरक्षण ! ! संघर्ष ! ! !

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

महाराष्ट्रातील माहिती अधिकार कार्यकर्ते,सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते ,पत्रकार व जागरूक नागरिकांकडून शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचार व गैरव्यवहारांची अनेक प्रकरणे बाहेर काढण्यासाठी माहितीचा अधिकार या कायद्याचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झालेला आहे.परंतु सदर कायद्याचा आणखी परिणामकारक वापर व्हावा व त्यातून प्रशासन आधिक पारदर्शी व लोकाभिमूख व्हावे या उद्देशाने माहिती अधिकारांचा वापर करणाऱ्या व करू इच्छिणाऱ्या जागरूक नागरिकांचे परस्परांना मदत व सहकार्य व्हावे व त्यांना वैधानिक मार्गदर्शन आणि सहकार्य मिळावे तसेच प्रशासनातील भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणण्यासाठी माहिती अधिकार कायदा नेमकेपणे कसा वापरावा ? नेमकी व मुद्देसूद माहिती कशी विचारावी ? कार्यकर्त्यांच्या अनुभवांची परस्परात देवाणघेवाण व्हावी म्हणून आरटीआय कार्यकर्त्यांचे महाराष्ट्रव्यापी व्यासपीठ असणे गरजेचे झाले आहे.तसेच माहिती अधिकार कार्यकर्त्यावर गंभीर हल्ले करणे तसेच धमक्या देणे असे प्रकार खूपच वाढले आहेत.या पासून कार्यकर्त्यांना सरंक्षण मिळावे तसेच त्यांना राज्याच्या राजधानी पासून ते आपल्या गावापर्यंत पाठबळ मिळावे म्हणून कार्यकर्त्यांच्या एकजूटीची खूपच आवश्यकता आहे. यासाठी तसेच महाराष्ट्रभरातील अनेक कार्यकर्त्यांशी व्यापक बोलणी व चर्चा केल्यानंतर आम्ही महाराष्ट्रव्यापी व सर्व राजकीय प्रवाहापासून अलिप्त व शुद्ध सामाजिक असा **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र** स्थापन केला असून या अंकामध्ये यांसबंधीचा एक सभासद फॉर्म दिला आहे.या महासंघाचे जिल्हा तालुका व शहर स्तरावरील पदाधिकारी म्हणून काम करण्यास इच्छूक असणारे माहिती अधिकार कार्यकर्ते, दक्ष व जागरूक नागरिकांनी हा फॉर्म सविस्तर भरून **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ,** प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर,नवी मुंबई -४१०२१० या पत्यावर पाठवावा.

यशाची पेरणी करण्यासाठी अपयशाचा हंगाम हा सर्वोत्तम काळ असतो.

जनजागृती! संरक्षण!! संघर्ष !!!

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

संपर्क : प्लॉट नं.ई-९६, सेक्टर- १२ खारघर, नवी मुंबई -४१०२१०

## सभासद फार्म

फोटो

नाव : ------------------------------------------------------------

पत्ता :-----------------------------------------------------------

--------------------------------- पीनकोड

मोबाईल :

ई मेल :---------------------

शिक्षण : ----------------------- जन्मदिनांक ------------------------------

व्यवसाय :--------------------- येणाऱ्या भाषा: ------------------------------

माहिती अधिकार कार्य व समाजकार्याचा अनुभूव किती वर्षाचा आहे: ---------------------

इतर कोणत्या राजकीय किंवा सामाजिक संस्थेशी संबधीत आहात : ---------------------

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे पदाधिकारी म्हणून कोणत्या स्तरावर कार्य करण्यास इच्छूक आहात ? :गाव/ शहर/ तालूका / जिल्हा /-----------------------------------

मी गंभीरपूर्वक व विवेकपूर्वक निवेदन करतो की मला आपण माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचा वार्षिक सभासद करून घ्यावे.मी सभासद फी व नागरिक अधिकार मासिकाची वार्षिक वर्गणी असे एकत्रीत ३०० रूपये भरीत आहे.सभासद ओळखपत्र व मासिकाचे अंक मला माझ्या पत्यावर पाठवून द्यावे.मी भारतीय संविधानाने घालून दिलेल्या कायदेशीर कक्षेत नागरिक म्हणून दिलेल्या अधिकारक्षेत्रातच कार्य करीन.

आपला विस्वासू

दिनांक : / /

ठिकाण : -------------

सही

सभासद कोड नंबर

### कार्यालयीन उपयोगासाठी

मासिक वर्गणी नंबर

- ओळखपत्र मुदत आरंभ दिनांक / / २०१२ मुदत समाप्तीचा दिनांक / / २०१३
- पदाधिकारी म्हणून नियुक्ती झाली ते पद ------------------------------ आयडी पाठविलाचा दिनांक /पोस्ट / कुरिअर
- मासिकांचा अंक पाठविण्यास सुरूवात केलेला महिना व वर्ष ------------- / २०१२
- मासिक वर्गणी व सभासद फीस रूपये मनिऑर्डर / बँक अकाऊंट / डी.डी./चेक ने दि. / / २०१ रोजी जमा झाली
- आपण वेबसाईट **rtimahasangh.weebly.com** वरूनही ऑनलाईन फार्म भरू शकता

ज्यांच्याकडून तुम्हाला काहीच मिळणार नाही त्यांच्याशी तुम्ही कसे वागता यावरून तुमचे चारित्र्य कळते.

# शेतकरी व जनावरांना दुष्काळाचा उपास

# कोठे गेला निधी? करा RTI तपास




महाराष्ट्र शासनाने नुकताच १२३ तालुक्यात अखेर दुष्काळ जाहिर केला आहे.आता दुष्काळाच्या नावाखाली केंद्राकडून भरपूर आर्थिक मदत उकळता येणार आहे.३७५१ कोटी ररूपयांची मागणी आताच केंद्राकडे केली आहे.अन्य काही कामाकडील निधी दुष्काळाच्या कामासाठी वळविता येणार आहे.दुष्काळ निवारणासाठी दीर्घकालीन उपाय योजना करण्यासाठी आपल्या राज्यकर्त्यांकडे इच्छाशक्ती शुन्य इतकी आहे परंतु दुष्काळांच्या निधी साठी तरतूद करण्यासाठी कोटी-कोटी ची उड्डाणे घेतले जात आहेत.एवढे सगळे कररूनही आता ही दुष्काळातली मदत दुष्काळाने होरपळलेल्या शेतकऱ्या पर्यंत खरेच पोहचणार की मध्येच गट्टम होणार हाच खरा प्रश्न आहे.

ग्रामीण भागात शेतकऱ्यांची स्थिती मोठी लाजीरवाणी झाली आहे.जनावरांच्या चाऱ्यांचा प्रश्न भयावह असा निर्माण झाला आहे.सप्टेंबरच्या पहिल्या आठवडयात दुष्काळ जाहिर झाल्यानंतर थोडाफार पाऊस पडला आहे.परंतु खरीपाची पिके हातची गेली आहेत.शेती व पिण्यासाठी पाणी उरलेले नाही.अशा परिस्थितीत आता दुष्काळी कामे निघतील,रोजगार हमी वर गरजुंची गर्दी वाढेल.अपुऱ्या जलंसिचनातील प्रकल्पाच्या पाटातून

**दुष्काळ म्हटले की पाण्याचा पत्ता नसतो मात्र पैसा मात्र पाण्यासारखा वाहतो.गरजु माणसाला मदत मिळणे कठीण, परंतु मंत्रालयातील बडया पुढारी-अधिकाऱ्यापासून गावपातळीवर तलाठी व गावपुढारी यांच्या पर्यंत सगळयांची चांदी होते.म्हणूनच दुष्काळात सामान्य जनता होरपळत असली तरी हा दुष्काळ पुढारी-अधिकारी यांना हवाहवासा वाटतो. ही वस्तूस्थिती असून माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी दुष्काळी मदतीवर डल्ला मारला जावू नये म्हणून दक्ष राहले पाहिजे**

पाणी कधी वाहिल हे परमेश्वर देखील सांगू शकणार नाही.परतु जलसवंर्धनाच्या नावाखाली पैशाचे जे पाट वाहतील त्यांतून पुढारी व त्यांचे डमी कंत्राटदार भाऊबंद तसेच सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या खिशात जी मलाई जाईन त्यातून त्यातून दुष्काळ ही त्यांच्यासाठी पर्वणीच ठरणार आहे.

नावे ठेवणाऱ्यांना प्रत्येक गोष्टीची किंमत माहित असते,परंतु कोणत्याच गोष्टीचं मोल माहित नसते.

## दुष्काळी भागातील माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी खालील अनुषंगाने लक्ष देवून सरकारी आस्थपनाला माहिती मागावी व अनियमीतता असल्यास सदर माहिती प्रसार माध्यमापर्यंत पोहचवावी

१.आपल्या तालुक्यात चारा डेपो कोठे व कधी सुरू झाला आहे.चारा वाटपाचे निकष काय ?

२.चारा वितरण किंवा छावणी कोणत्या संस्थेच्या माध्यमातून सुरू झाली आहे.या संस्थेवर कोणत्या सरकारी विभागाचे नियंत्रण आहे.शासन व संस्था यांच्यातील कराराची प्रत द्यावी.

३.चारा डेपो त किती चारा आला.केव्हा आला.कोणत्या शेतकऱ्यांला किती वितरीत करण्यात आला.

४.चारा मिळविण्यासाठी,किंवा जनावरे छावणीत दाखल करण्यासाठी प्रभावी राजकीय पुढारी असणाऱ्या शेतकरी पुढाऱ्यांना तलाठयांने दिलेल्या पात्रता पत्रामध्ये जनावरांच्या संख्या वाढवून तर दिली नाही ना ? याचा माहिती अधिकार कायद्यात अर्ज करून खात्री करून

४.जनावराच्या छावणी मध्ये किती शेतकऱ्यांची किती जनावरे केव्हा दाखल झाली ? प्रति जनावर रोज किती चारा दिला गेला ? चाऱ्याचा शिल्लक साठा ? चाऱ्याची रुपयातील किमंत

५.छावणीतील जनावरांचे जमा झालेले शेण किती ? या शेणाची रुपयातील किंमत किती ?

शेणाचा विक्री लिलाव पद्धतीने होणार असल्यास ही विक्री प्रक्रिया पारदर्शक कशी होईल ?

आपल्या गावात सुररू असलेल्या रोजगार हमी कामाची माहिती अधिकारात माहिती घ्यावी.

दुष्काळ जाहिर झालेल्या किंवा दुष्काळी सददृष्य टंचाई ग्रस्तगावामध्ये पाणी टंचाई हा मोठा कळीचा व गरजेचा प्रश्न बनलेला आहे.आता टँकरने पाणी पूरवठा करण्याचे अधिकार जिल्हा अधिकारी यांना देण्यात आले आहेत.टँकरने पाणी पूरविण्याच्या संख्येत वाढ झाली आहे.या पाणी पूरवठयात मोठा भ्रष्टाचार टँकर लॉबी करीत आली आहे.अशी अनेक प्रकरणे यापूर्वी उघड झाली आ हे त्यामुळे गावामध्ये जागररूकपणे कार्यक रणाऱ्या युवकांनी व कार्यकर्त्यांनी सर्तक राहून टँकर लॉबी तील सहभागी गावपुढारी,सरकारी कर्मचारी पाणी पूरवठयात भ्रष्टाचार तर करीत नाहीत ना ? या वर लक्ष ठेवावे.

गावात रोज किती टँकर पाणी आले ? कधी आले याची सरकारी कर्मचारी नोंद घेतात तशीच पर्यायी नोद कार्यकर्त्यांनी करावी.

कंत्राटदाराला प्रति टँकर किती मोबदला दिला जातो.पाण्या स्त्रोत गावापासून किती अंतरावर आहे.सरकारी अधिकाऱ्यांच्या तपासणी अहवालात या स्त्रोत किती अंतरावर दाखविला आहे.

टँकरच्या खेपा किती दाखविल्या आहेत यांची प्रत्येक साप्ताहिक अहवाल मिळवून घ्यावा व तो तपासून त्यांची सत्यता पडताळावी

# पेट्रोलपंपावरील सुविधा आणि ग्राहकांचे अधिकार



१ . आजच्या धकाधकीच्या व वेगवान दुनियेत मालकीचे वाहन असणे ही अत्यावश्यक गरज बनलेली आहे.त्यामुळे वाहनधारकांना इंधन भरण्यासाठी पेट्रोलपंपावर पेट्राल किंवा डिझेल किंवा वायुगॅस भरण्यासाठी जावेच लागते.या इंधन ग्राहकांनी केवळ पेट्रालपंपावर जायचे आणि दिले तसे देईल तसे इंधन भरावे आणि चालू लागावे हे दिवस आता राहिलेले नाहीत.पेट्रोलपंपावर इंधन भरणाऱ्या ग्राहकांचे काही हक्क व अधिकार आहेत.इंधना बरोबरच ग्राहकांना काही विशेष सेवा देणे पेट्रोल पंप चालकावन बंधनकारक असून त्या सेवा जागरूक ग्राहक व जागरूक वाहनधारक म्हणून आपणास माहित असायलायच हव्यात.कोणते आहेत.अशा ग्राहकांचे विशेष अधिकार आपण पाहूया

पेट्रोलपंपावर ग्राहकांना विशेष सेवा पुरविणे बंधनकारक आहे.

१.गाडीच्या चाकांतील हवा चेक करणे हवा भरणे निशुल्क

२.पिण्याचे पाणी, टॉयलेट सुविधा तसेच रेडियेटर मध्ये पाणी निशुल्क

३. तक्रार आणि सूचना पुस्तिका मागणीनुसार दिलीच पाहिजे.त्यात आपण तक्रार लिहू शकता

४.पेट्रोलपंप चालू व बंद असणाच्या वेळा, कामाचे दिवस व सुटटीच्या दिवसाचा स्पष्ट तक्ता प्रदर्शीत केला पाहिजे

५.तेल कंपनीच्या अधिकाऱ्याचे नाव पत्ता आणि टेलीफोन नंबर.आपण तक्रार असल्यास फोन संपर्क करू शकता.

६.पुरेसा प्रकाश,स्वच्छता तसेच प्रथमोपचार पेटी असणे बंधनकारक आहे.

ग्राहकांना गुणवत्ता पूर्ण सेवा देणे हे पेट्रोलपंपचालकाचे कर्त्यव्य असून वरील सुविधा देणे हे पेट्रोललियम व नैसर्गिक गॅस मंत्रालयांनी दिलेल्या दिशानिर्देशामध्ये स्पष्ट केले असून अशा सुविधा न देणाऱ्या पेट्रोलपंप चालकांवर सुविधा विनाविलंब देण्याचे निर्देश व दंडात्मक कारवाई केली जावू शकते.

तसेच तेल उत्पादनांची गुणवत्ता तपासण्यासाठी खालील प्रमाणे ग्राहकांना अधिकार आहेत

१.प्रत्येक पेट्राल पंपावर तेलाची गुणवत्ता तपासणयासाठी फिल्टर पेपर ठेवणे बंधनकारक आहे.ग्राहकांनी मागीतल्यास फिल्टर पेपर दिलाच पाहिजे. पेट्रोल पंपातील नोजल स्वच्छ व साफ करून फिल्टर पेपरवर पेट्रोलचे काही थेंब टाकावेत दोन-तीन मिनीटानंतर फिल्टर पेपरवर काही डाग व धब्बे दिसले तर

पेट्रोलमध्ये भेसळ आहे असे समजावे.जर फिल्टर पेपर पूर्वीप्रमाणेच स्वच्छ व साफ दिसला तर पेट्रोल शुद्ध आहे असे समजावे.

२.पेट्रोल पंपा चालकांनी तेलाची घनता मोजण्याचे व घनता नोंदीची उपकरणे ठेवली पाहिजेत.

३.पंप डिलर नी पाच लिटर चे माप ठेवणे जरूरी आहे.आपण मापाने मोजून पेट्रोल घेवू शकता. हे माप दरवर्षी वजने व मापे नियंत्रकाकडून प्रमाणित केलेल असणे आवश्यक आहे

४.तेलाच्या किंमती स्पष्टपणे दिसतील अशा प्रदर्शीत केल्या पाहिजेत.मिटर रिंडींग शुन्य केले आहे याची ग्राहकांनी खात्री करून घ्यावी.भेसळ असल्याची शंका

आल्या फिल्टर पेपर परिक्षण करावे.तक्रार असल्यास तक्रार पुस्तिकेत तक्रार लिहावी.तेल कंपनीच्या अधिका-यांना टेलीफोन संपर्क करून तक्रार करता येईल.

तेल कंपनीच्या अधिकाऱ्याचे नाव पत्ता व संपर्क क्रमाक पेट्रोलपंपावर प्रदर्शीत केले नसेल तर संबधीत तेल कंपनीच्या रिजनल ऑफिस कडे तक्रार करावी.तक्रार लेखी द्यावी.तक्रारीची पोच घ्यावी.तीस दिवसात तक्रार निवारण करणे कंपन्यावर बंधनकारक असते.

# महाराष्ट्र राज्यातील माहिती आयुक्तांचे पत्ते आणि संपर्क नंबर

| नाव/पदनाम | पत्ता | कार्यालयीन दूरध्वनी क्र. | मोबाईल क्र. | ई-मेल |
|---|---|---|---|---|
| राज्य मुख्य माहिती आयुक्त, मुंबई. | राज्य माहिती आयोग, १३ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई ३२. | ०२२-२२८५६०७८ | | sic-mh@nic.in |
| राज्य माहिती आयुक्त, पुणे. | राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय इमारत ४ था मजला, कॉन्सिल हॉल समोर, पुणे. | ०२०-२६०५०५८० | | sicpun-mh@nic.in |
| राज्य माहिती आयुक्त, कोकण. | राज्य माहिती आयोग, १ ला मजला, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई. | ०२२-२७५७०३२३/ २७५७१४६३/६४ | | sickon-mh@nic.in |
| राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई. | राज्य माहिती आयोग, १३ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई ३२. | ०२२-२२२०४००८६ | | sicgmum-mh@nic.in |
| राज्य माहिती आयुक्त, अमरावती. | राज्य माहिती आयोग, भातकुली तहसील परिसर कार्यालय, कॅम्प अमरावती. | ०७२१-२५५३१७२ | | sicamr-mh@nic.in |
| राज्य माहिती आयुक्त, नाशिक. | राज्य माहिती आयोग, विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक. | ०२५३-२२३२७६४ | | sicnas-mh@nic.in |
| राज्य माहिती आयुक्त, नागपूर. | राज्य माहिती आयोग, विभागीय आयुक्त कार्यालय परिसर, १ ला मजला, नवीन प्रशासकीय इमारत क्र.२ जिल्हापरिषदेसमोर नागपूर. | ०७२१-२५४२५१८ | | sicnag-mh@nic.in |
| राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद. | राज्य माहिती आयोग, अल्प बचत भवन इमारत, कोषागर कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद. | ०२४०-२३५२१३३ | | sicaur-mh@nic.in |

एखादी व्यक्ती जितक्या वेगाने आपल्या मनावर गारूड करते,तितक्यात झटकन तो मनातून उतरतेही.

# १५० शब्दात अर्ज हा आदेश नव्हे तर ही केवळ मार्गदशक सूचना ! सरकारचे उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र

मुंबई - माहिती अधिकाराच्या सुधारीत कायद्यात माहिती अधिकारात अर्ज करताना १५० पेक्षा अधिक शब्द असून नयेत हा आदेश नसून मार्गदर्शक सूचना आहेत.असे स्पष्टीकरण सरकारने प्रतिज्ञापत्राद्वारे उच्च न्यायालयात दिले आहे.माहिती अर्ज मुद्देसुद असावा यासाठी हे नियम केल्याचेही या प्रतिज्ञापत्रात नमुद करण्यात आले आहे.

माहिती अधिकार कायद्यात बदल करून माहिती अधिकार अर्जात एकच विषय व शब्द मर्यादा १५० पेक्षा जास्त असू नये अशी मर्यादा सरकारने घातली होती.त्याला अँड.शिवाजी क्षिरसागर यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिकेद्द्वारे आव्हान दिले असून त्यावर सरकारने हे प्रतिज्ञापत्र न्यायालयासमोर सादर केले आहे.

माहिती अधिकारात अर्जदारांनी केवळ १५० शब्दात अर्ज करातवे असे ठरविल्यानंतर अनेक जनमहिती अधिकार माहिती दिल्याने भ्रष्टाचार उघड होत असल्याने किंवा माहिती देणे गैरसोईचे होत असल्याने अर्जदारास आपला अर्ज १५० शब्दात नाही असा शेरा मारून माहिती देण्याचे टाळत आहेत.

ॲड.शिवाजी क्षिरसागर यांनी या शासनाच्या निर्णयास उच्च न्यायालयात आव्हान दिले असून सरकारची ही सुधारण मूळ कायद्याशी विसंगत अशी आहे.असा दावा केला होता.यासंबधी शासनाला प्रतिज्ञापत्र सादर करून आपले म्हणणे मांडावे असे कोर्टाने आदेश दिले होते.या प्रतिज्ञापत्रात सरकारने हे नियमातील बदल म्हणजे मार्गदर्शक सूचना आहेत.अर्जदारांनी एकाच अर्जात व्यापक व विविध विषयावरील माहिती मागीतल्याने अशी माहिती ३० दिवसात देणे शक्य होत नाही.म्हणून माहिती मागण्याची व माहिती मागण्यची प्रक्रिया सूलभ व सुटसूटीत व्हावी यासाठी हे बंधन घातल्याचेही शासनाने प्रतिज्ञापत्राद्द्वारे न्यायालयासमोर स्पष्ट केले आहे.

---

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या कार्यकर्त्यांना सूचना

माहिती अधिकार कार्यकर्ता महांसघाच्या गाव,तालुका व जिल्हा पदाधिकारी म्हणून अनेक कार्यकर्त्यांना काम करण्यासाठी महासंघाने नियुक्तीपत्रे आणि ओळखपत्रे तसचे मार्गदर्शनाचा व्यापक पाठिंबा देण्याचा गेल्या दीड वर्षापासून सतत प्रयत्न केला आहे.बहुसंख्य कार्यकर्ते आपापल्या कार्यक्षेत्रात नागरिकांना आपले नागरी हक्क कळावेत तसचे माहिती अधिकारांचा वापर करून आपल्या परिसरातील प्रशासन पारदर्शक राहावे म्हणून जीवाची बाजी लाूवन प्रामाणिकपणे , हिम्मतीने व धैर्याने काम करीत आहे. अशा प्रामाणिक व खरेच समाजात काही बदल घडवून आणू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांच्या बरोबर महासंघ नेहमीच राहणार आहे .अशा प्रशिक्षीत व प्रमाणिक कार्यकर्त्यांची राज्यभर व्यापक फळी उभी करण्याचा महासंघाचा प्रयत्न आहे.

परंतु माहिती अधिकार महासंघाचा व्यापक उद्द्देश लक्षात न घेता काही कार्यकर्त्यांनी गाव,तालुका व जिल्हा स्तरावर काम करताना सार्वजनिक व व्यापक लोकहिताच्या कामापेक्षा व्यक्तीगत लाभासाठी,पूर्वग्रहदुषीत उद्द्देशाने ओळखपत्राचा व महासंघाच्या परवानगी शिवाय लेटरपॅडचा वापर सुरू केल्याच्या काही तक्रारी महासंघाच्या मुख्यकार्यालयाकडे आल्या आहेत.याची चौकशी सुरू असून चूकीचे काम करणाऱ्यांना माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ मुळीच थारो देणार नाही.अशा कार्यकर्त्यांची सभासदत्व तात्काळ रद्द केले जाणार आहे.

प्रत्येक कार्यकर्त्यांनी आपला त्रैमासिक आहवाल व गाव,तालुका व जिल्हा अध्यक्षांनी आपला मासिक अहवाल मुख्य कार्यालयास पाठविणे बंधनकारक आहे.आपण माहिती अधिकार कायद्याची जनतेला सांगितलेली माहिती,शासकीय कार्यलयाला मागीतलेल्या माहितीचा तपशील,जोडलेले नवीन कार्यकर्ते,नवीन सभासद नोंदणी आदीची माहिती अहवालात असणे आवश्यक आहे.ज्या तालुका व जिल्हा पदाधिकाऱ्यांनी असे आहवाल पाठविलेले नाहीत त्यांनी तात्काळ पाठवावेत अन्यथा त्यांना दिलेल्या जबाबदारीचा तात्काळ पूनर्विचार केला जाईल.

**धन,ताकद,बुद्धी ही सच्च्या माणसांची बलस्थाने असूच शकत नाहीत.खरे बलस्थान आहे आचरण !**

## मोहम्मद युसूफ हुसेन गुलाम हुसेन सिद्धीकी काटेवाले यांना भावपूर्ण श्रद्धांजली



मोहम्मद युसूफ हुसेन गुलाम हुसेर सिद्धीकी काटेवाले यांचे २ सष्टेंबर २०१२ रोजी नांदेड येथे दु:खद निधन झाले.काटेवाला हे माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे तळमळीचे कार्यकर्ते होते.त्यांचा काटे दुरूस्तीचा व्यवसाय होता.त्यामुळे त्यांचे मराठवाडा व विदर्भात सतत सर्वदूर फिरणे होत असे.त्यांचा संपर्क ही मोठा होता.सरकारी काम अन् सहा महिने थांब असा अनुभव प्रत्येकालाच येतो. कोणाचीही सरकारी कार्यालयात अडवणूक होतेय असे वाटताच काटेवाला अशा अडवणूक झालेल्या व्यक्तीला मराठवाडी ढंगातील हिंदीतून एकच रामबाण उपाय सूचवायचे, माहिती अधिकार का वापर करो !

माहिती अधिकार कायद्याचा व माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचा प्रचार व प्रसार हे त्यांचे व्रत्तच होते.महासंघाचे सभासद करणे व नागरिक अधिकार मासिकाची वर्गणी कार्यालयाला पाठविणे हे त्यांचे नेहमीचेच कार्य ठरले होते.मोबाईलवर ते फार आबदीने बोलायचे शुक्रीया,बहोत-बहोत शुक्रीया !! हे तर ठरलेलेच असायचे.

माहिती अधिकार महासंघाच्या कार्यातील त्यांचे योगदान व निष्ठा पाहता राज्य कार्यकारणीने सहमताने त्यांची निधनाच्या दोन दिवस अगोदरच त्यांची महाराष्ट्र उपाध्यक्ष पदी निवड केली होती.नियुक्तीचे पत्र मिळताच त्यांनी मला मोबाईल करून आनंद व्यक्त केला होता.अब आरटीआय महासंघ का झेंडा चांद तक पहूचाऊंगा असं ते म्हणाले होते.त्यावर मी गमतीने म्हणालो होतो की,काटेवाला साब आपका नाम ही इतना लंबा है की आपके नाम की सीडी बनाकर चाँद की और चढते रहेंगे तो जरूर कोईभी चाँद पर पहूचेंगा.यावर ते मनापासून हसले होते.

त्यानंतर तिसऱ्या दिवशी सकाळी त्यांच्या मुलांचा मोबाईल आला की सर काटेवाला साब इक्सपायर हो गये ! क्षणभर विस्वास बसला नाही.परंतु नियतीने खरेच डाव साधला होता.आमचा एक सहकारी चंद्राच्याही पुढे अज्ञाताच्या प्रवासाला निघून गेला होता.काटेवाला यांना माहिती अधिकार महासंघाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली !

- सुभाष बसवेकर

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ

## मासिक नागरिक अधिकार

## स्वराज बहुउद्देशीय संस्थेच्या

## सर्व उपक्रमांची, कार्यक्रमांची माहिती

## आता थेट इंटरनेटवरही उपलब्ध

## गुगल सर्च करा

rtimahasangh.weebly.com

google site swarajlokabhiyan

http://subhashbaswekar.blogspot.in/

नागरिक अधिकार चे ताजे अंक वाचा माहिती अधिकार महासंघ महाराष्ट्रातील सभासदांची व कार्यकर्त्यांची सर्व इंत्यूभूत माहिती पहा. तसेच आता थेट ऑनलाईन सभासद फार्म भरता येतील

सुंदर व्यक्ती चांगली असेलच असे नाही,परंतु चांगली व्यक्ती नक्कीच सुंदर असते.

महाराष्ट्रात अलिकडे स्कूलबस दूर्घटनाच्या पार्श्वभूमीवर नवे स्कूलबस धोरण जाहिर व बंधनकारक केले असून ते राबविण्याची जबाबदारी पोलीस वाहतूक शाखा व आरटीओ कार्यालया यांच्यावर टाकलेली आहे.परंतु स्कूल बस धारक नियम व सूचनाचे पालन न करता धोकादायक व मानमानी पद्धतीने चालतात.या विषयी पालकांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी माहिती अधिका कायद्याचा वापर करून आरटीओ कार्यलयाला जबाबदारीने वागण्यास भाग पाडणे आवश्यक आहे.

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अनुसार अर्ज
(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,

जनमाहिती आधिकारी
प्रादेशिक परिवहन आधिकारी
----------- जि.रायगड

१) अर्जदाराचे नांव ------------------------------------------------

२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता :---------------------------------------------

३) माहितीचा विषय - आपल्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील स्कूल बसची वाहन नोंदणी व तपासणी तसेच अनुज्ञाप्ती धारकांची माहिती मिळणेबाबत.

४)आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी (पुढीलप्रमाणे)

१) आपल्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील --------तालुक्या मध्ये एकूण किती स्कूल बसची नोंदणी झाली आहे ?प्रत्येक स्कूल बसचा नोंदणी क्रमांक तसेच स्कूल बसच्या मालकांचे नांव व पत्ता ,
कोणत्या शाळेसाठी स्कूल बसची नोंदणी झाली आहे त्या शाळेचे नावआदी तपशील द्यावा.

२) आपल्या कार्यालच्या कार्यक्षेत्रातील --------तालुक्या मध्ये सद्या कार्यरत असलेल्या किंवा सद्या नोंदणी पटावर असलेल्या किती स्कूल बसचे ,मोटार निरिक्षकांकडून करून घ्यायचे वार्षीक निरिक्षण पूर्ण झाले आहे ? किती स्कूल बसचे वार्षिक निरिक्षण झालेले नाही ? याचा तपशील द्यावा.कायदेशीर मुदतीत वार्षीक निरिक्षण किंवा फिटनेस प्रमाणपत्र न घेतलेल्या स्कूल बस धारकांची नावे व वाहन क्रमांक याची माहिती द्यावी ?

३) परिवहन कार्यालयातील नियमाप्रमाणे स्कूल बस नोंदणी नियमाप्रमाणे प्रत्येक आसनासाठी किती वार्षिक नोंदणी शुल्क आकारले जाते ? सन.२०१० मध्ये स्कूल बस नोंदणी मधून किती महसूल जमा झाला होता ? सन.२०११मध्ये फेब्रुवारी २०११ पर्यंत किती महसूल जमा झाला ?

४) महाराष्ट्र सरकारने अलिकडे लागू केलेल्या स्कूल बस नियमावलीची झेरॉक्स प्रत मिळावी. तसेच या नियमावली माहिती असणारा आपल्या कार्यालयाशी शासनाने केलेल्या पत्रव्यवहाराची शासनादेशाची प्रत द्यावी.

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश : माहिती मी व्यक्तीश: घेऊन जाईन.

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील नाही (१० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

अर्जदाराची सही

ठिकाण :---------

दिनांक : (------------------)

**Mo: -----------------**

ज्या समाजात न्याय अधिक परिपूर्ण व तात्काळ मिळतो तो आदर्श समाज होय.

अनेक सार्वजनिक स्थळी अस्वच्छता ही नित्याची बाब झालेली आहे.राज्य भरातील बसस्थानके ही बऱ्याच वेळा अपवाद वगळता गचाळ व अस्वच्छ असतात.बस स्थानकावरील शौचालयासाठी सुद्धा नागरिकांची अडवणूक करून अधिक रूपये घेतले जातात. बऱ्याचदा एसटीचे अधिकारी या प्रकाराकडे चालायचेच म्हणून डोळझाक करतातृमाहिती अधिकार कायद्याचा वापर करून माहिती अधिकार कार्यकर्ते माहिती मागवून सत्य सर्वासमोर मांडू शकतात.यातून काही तरी बदल नक्कीच घडून येवू शकतो.

माहितीचा अधिकार कायदा २००५ -कलम ३ अन्वये अर्ज
(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,
जनमाहिती आधिकारी
एसटी महामंडळ / विभागीय कार्यालय
-------------आगार

१) अर्जदाराचे पूर्ण नाव :-------------------------------------------------------

२) पत्रव्यवहाराचा पत्ता :--------------------------------------------------------

३) माहितीचा विषय - बस स्थानक ----------येथील झाडलोट / साफसफाई व स्वच्छता व सार्वजनिक शौचालय व्यवस्थापन करणाऱ्या यंत्रणेची माहिती मिळणेबाबत

४) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी .

१) ---------बस स्थानक येथे दैनंदिन साफसफाई ,शौचालय व्यवस्था ठेकेदारी / कंत्राटी पद्धतीने करून घेतली जाते काय ? अशा पद्धतीने साफसफाई व स्वच्छता करून घेतली जात असल्यास या कामासाठी किती कंत्राटदार किंवा ठेकेदार नियुक्त केले आहेत ? सदर कामाचा ठेका त्यांना केव्हापासून देण्यात आला आहे? सदर ठेकेदाराने किमान व कमालकिती कामगार कामावर ठेवावेत असा करार आहे ? आज रोजी किती कामगार झाडलोट व साफसफाईचे काम करतात ? ठेकेदाराची नावे व पत्ता द्यावा. ठेकेदारांकडे लेबर कॉन्ट्रक्ट कायद्यानुसार योग्य त्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी दिलेली अनुज्ञाप्ती (लायसन्स ) आहे काय ? सदर अनुज्ञाप्ती आज दिनांक रोजी वैद्य आहे काय ?ठेकेदारबरोबर करार करताना एसटी महामंडळाने ठेकेदारकडून कोणकोणती कागदपत्रे घेतली ? या कागदपत्रांच्या सत्यप्रती चा एक संच उपलब्ध करून द्यावा.

२)सदर ठेकेदाराबरोबर एसटी महामंडळाने किती वर्षासाठी व कधीपासून करार केला आहे ? करारानुसार ठेकेदारस किती रूपये मासिक / त्रैमासिक / अर्धवार्षिक / वार्षिक अशा स्वरूपात किती रक्कम दिली जाते ? ठेकेदाराने स्त्री-पुरूष कामगारांना किती रूपये मासिक वेतन द्यावे ? असा काही करारात उल्लेख आहे काय ? असल्यास किती ? कराराप्रमाणेते दिले जाते काय ? दिले जात नसल्यास ठेकेदाराविरोधात काय कारवाई केली गेली ? याची जबाबदारी असणाऱ्या संबंधीत अधिकारी यांचे नाव हुद्दा व पत्ता कळवावा. सदर करारातील नियम अटी व शर्थी यांची एक सत्य प्रत द्यावी.

३) ठेकेदारने मजूर / कामगार स्त्री- पुरूषांना दैंनदिंन किंवा मासिक पगाराच्या शिवाय अन्य कोणकोणत्या सुविधा पुरवाव्यात असे करारात ठरले आहे ? अशा सुविधा पुरवल्या जातात काय ? पुरवल्या जात नसल्यास ठेकेदारांवर काय कारवाई केली गेली आहे ?

४) सदर कामाचा सदर ठेकेदारास ठेका देताना ठेक्यासंबंधीची प्रक्रिया निवीदा पद्धतीने राबवली गेली होती काय ?या कामसाठी किती निवीदा आल्या होत्या ?या सर्व निविदांचा तुलनात्मक तक्ता द्यावा. ठेका देताना निविदा पद्धती राबवली नसल्यास का राबवली गेली नाही ? स्पर्धात्मक निवेदशिवाय ठेका दिला गेला असल्यास तो कशाच्या आधारावर दिला गेला ? आणि अशा पद्धतीने निविदेशिवाय ठेका देणे कायद्याच्या चौकटीत वैध ठरते काय ?

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश : माहिती मी व्यक्तीश: घेऊन जाईन.

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील नाही (१० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश : माहिती मी व्यक्तीश: घेऊन जाईन.

६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील नाही (१० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

अर्जदाराची सही

ठिकाण :---------
दिनांक :

(------------------)

**Mo: ----------------**

जो व्यक्ती प्रत्येकालाच गोड-गोड बोलत राहतो,तो खरे तर कोणालाच गोड बोलत नाही.

शेवटचे पान ..

प्रेरणा

# सुरूवात स्वत:पासून करायला पाहिजे !

लढण्याची हिम्मत नसेल तर
काहीच होऊ शकत नाही,
अन्याय समोर दिसूनही बोलण्याची
इच्छाच होऊ शकत नाही.
कोणीतरी लढावे
आपण फक्त पहावे
कूत्र्या सारखी शेपटी घालून
दबल्या विश्वात जगावे
चिढयेते मला समाजातील
अशा माणसांची
कळत नाही त्यामुळेच
हिम्मत वाढते नराधमाची
म्हणून प्रत्येकाने
अन्यायाविरोधात आवज उठवला पाहिजे
कोणीतरी करेल का ?
....सुरूवात आपल्यापासून करायला पाहिजे !

- प्रशांत भट

प्रति,

पोस्ट परवाना. No.G/NMD/128/2012-14

पाठविणार

पत्ता: **नागरिक अधिकार**
प्लाट नं. ई-१६, सेक्टर-१२ खारघर,
नवी मुंबई ४१०२१० महाराष्ट्र
मो ९२२३५१६१७०

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुभाष महादेव बसवेकर यांनी स्वराज प्रिंट प्रोसेस कार्यालय, सेक्टर-१०, कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे मुद्रीत करून, अे विंग फ्लॅट-०३ साईसदन सोसायटी प्लॉट नं.५६ सेक्टर-१९ खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१०येथे प्रकाशीत केले.
रजि नं. MAHMAR/2011/40781